(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

प्रकाशनयोग्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

फौजदारी अपीलीय अधिकारिता

फौजदारी अपील क्रमांक ८३८/२०२१

(विशेष अनुमती याचिका (फौ.) क्रमांक ५४४२/२०२१ मधून उद्भवणारे)

सिद्धार्थ .... अपीलकर्ता

विरुद्ध

उत्तरप्रदेश राज्य आणि इतर .... उत्तरवादी

<u>आदेश</u>

अनुमती दिली.

अपीलकर्त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर व्हायला पाहिजे होता की नाही, हा आमच्यासमोर संक्षिप्त मुद्दा निर्णयासाठी आहे. आम्ही हे नोंद करू इच्छितो की, दिनांक ०२/०८/२०२१ च्या आदेशान्वये अंतरिम संरक्षण मंजूर केले होते.

समोर आलेली वस्तुस्थिती अशी आहे की, सात वर्षांपूर्वी दाखल करण्यात आलेल्या एका प्रथम खबरी अहवालामध्ये अपीलकर्त्याला इतर ८३ खाजगी व्यक्तींसह गोवण्यात आले होते. अपीलकर्ता हा दगडांचा पुरवठादार असल्याचा दावा करतो, ज्यासाठी या धारकांना स्वामित्व हे आगाऊ देण्यात आले होते आणि त्याचा असा दावा आहे की, त्याचा निविदा प्रक्रियेत सहभाग नव्हता. अशाच दुसऱ्या एका व्यक्तीला

पोलीस अहवाल (आरोपपत्र) दाखल होईपर्यंत अंतरिम संरक्षण देण्यात आल्याचे सांगण्यात आले. अपीलकर्ता हा या न्यायालयासमक्ष येण्यापूर्वीच तपास प्रक्रियेत सहभागी झाला होता आणि आरोपपत्र दाखल करण्यास तयार असल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, अटक मेमो निर्गमित करण्यात आल्यामुळे, या न्यायालयापुढे त्याला येण्याचे कारण ठरले.

उत्तरवादीतर्फे उपस्थित विद्वान वकील यांनी आमच्यापुढे हा मुद्दा नाकारला नाही की, आरोपपत्र दाखल करण्यासाठी तयार होते, परंतु, त्यांनी असे सादर केले की, न्यायचौकशी न्यायालयाने असे मत मांडले आहे की, जोपर्यंत व्यक्तीला ताब्यात घेतले जात नाही तोपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७० नुसार आरोपपत्र अभिलेखावर घेतले जाणार नाही.

वादाचे अवलोकन करण्याकरिता आम्ही फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७० च्या तरतुदी खालीलप्रमाणे उद्धृत करीत आहोत.

> " १७०. जेव्हा पुरावा पुरेसा असेल तेव्हा दंडाधिकाऱ्याकडे पाठवायची प्रकरणे -(१) जर पूर्वोक्त असा पुरेसा पुरावा किंवा वाजवी आधार आहे असे या प्रकरणाखालील अन्वेषणान्ती पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला दिसून आले तर, असा अधिकारी बंदोबस्तनिशी आरोपीला पोलीस अहवालावरून अपराधाची दखल घेण्याची व आरोपीची संपरीक्षा करण्याची किंवा त्याला संपरीक्षेसाठी पाठवण्याची शक्ती प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवेल अथवा जर अपराध जामीनपात्र असेल

व आरोपी जामीन देण्यास समर्थ असेल तर, दंडाधिकारी त्याच्याकडून निश्चित केलेल्या दिवशी अशा दंडाधिकाऱ्यापुढे त्याने उपस्थित होण्यासाठी व अन्य निदेश दिला जाईपर्यंत अशा दंडाधिकाऱ्यापुढे त्याने रोजच्या रोज समक्ष हजर राहण्यासाठी जामीन घेईल.”

वरील तरतुदींवर भाष्य करणारी दिल्ली उच्च न्यायालयाची न्यायिक पूर्वोदाहरणे यद्यापी उपलब्ध आहेत.

या न्यायालयाने स्वाधिकारांतर्गत केंद्रीय अन्वेषण ब्युरो[1] यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या प्रकरणात उत्तरवादी यांच्या कथनाशी समान असलेल्या युक्तिवादाचे प्रकरण हाताळले आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १७० हे न्यायचौकशी न्यायालयास जोपर्यंत आरोपीस ताब्यात घेतले जात नाही, तोपर्यंत आरोपपत्र अभिलेखावर घेण्यास प्रतिबंधित करते. त्या संबंधित उतारे हे खालीलप्रमाणे आहेत.

“ १५. या कलमांतर्गत आढळणारा ‘कोठडी’ ह्या शब्दात पोलिस अथवा न्यायिक कोठडी यांपैकी एकाचाही समावेश होत नाही. तो फक्त तपासी अंमलदाराद्वारे आरोपीस आरोपपत्र दाखल करण्याच्या वेळेस न्यायालयासमोर हजर करणे असा अर्थ सूचित करतो, ज्यानंतर न्यायालयाची भूमिका सुरू होते. जर असे झाले नसते तर, तपासी अधिकाऱ्यास आरोपीवर खटला चालवण्यासाठी पुरेसा पुरावा सापडल्यानंतर, जामीनपात्र गुन्ह्यात एखाद्या व्यक्तीला जामिनावर सोडण्याचे अधिकार दिले गेले नसते आणि न्यायालयाकडून जामिनावर

1 २००४ (७२) डी आर जे ६२९

सुटण्यासाठी अशा आरोपीला दंडाधिकाऱ्यासमोर हजर करणे त्याच्यावर बंधनकारक झाले असते.

१६. जर पोलीस/ तपासी अधिकाऱ्यास कोठडीत असलेला आरोपी फरार होणार नाही किंवा तो समन्सची अवज्ञा करणार नाही कारण, तो तपासात सहकार्य करत आहे आणि त्यास अटक न करता तपास पूर्ण केला जाऊ शकतो या कारणासाठी असे वाटत असेल तर, कोठडीत असलेल्या आरोपीस हजर ठेवणे अनावश्यक आहे, तर तपासी अंमलदारावर अशा आरोपीस कोठडीत ठेवून हजर करणे बंधनकारक नाही.

[...]

१९. प्रत्येक अजामीनपत्र आणि दखलपात्र गुन्ह्यात पोलीसांनी एखाद्या व्यक्तीला तपासाच्या हेतूने आवश्यक नसले तरीही त्याला अटक करणे आवश्यक असते, अशा चुकीच्या कल्पनेखाली विद्वान विशेष न्यायाधीश परिश्रम करत असल्याचे दिसून येते.

२०. खरे तर कायदा काहीसा वेगळा आहे. एखाद्या व्यक्तीला अटक न करता तपास पूर्ण करणे पोलिसांना शक्य असल्यास आणि आरोपीने तपास अधिकाऱ्यांना सर्वप्रकारे सहकार्य केले असल्यास, नियमित आणि सर्वसामान्य परिस्थितीत पोलिसांनी नेहमी एखाद्या व्यक्तीला अटक करणे आणि त्याला तुरुंगात पाठविणे टाळले पाहिजे. हे केवळ अत्यंत आवश्यक असलेल्या प्रकरणांमध्येच आहे, जेथे व्यक्तीला अटक केल्याशिवाय तपास

पूर्ण करता येत नाही, उदाहरणार्थ - गुन्ह्यात गुंतलेली वस्तू किंवा शस्त्र हस्तगत करण्यासाठी किंवा आरोपीच्या साथीदारांबद्दल किंवा इतरांबद्दल काही माहिती किंवा सुगावा किंवा कोणताही परिस्थितीजन्य पुरावा मिळवण्यासाठी एखाद्या व्यक्तीस अटक करणे आवश्यक असू शकते. जर संबंधित तपासी अधिकारी किंवा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना असे वाटत असेल की, तीव्र आणि गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यामुळे आरोपीचे हजर राहणे कठीण आहे, तर अशा अटकेची आवश्यकता असू शकते, कारण, तो फरार होण्याची किंवा कार्यवाहीची अवज्ञा करण्याची किंवा न्यायदानाच्या प्रक्रियेपासून पळ काढण्याची शक्यता नाकारता येत नाही. "

नंतरच्या न्यायनिर्णयामध्ये, दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्वाधिकारांतर्गत दाखल केलेल्या (उपरोल्लेखित) प्रकरणामध्ये मांडलेल्या निरीक्षणांवर स्वाधिकारांतर्गत सरकार[2] विरुद्ध दाखल केलेल्या प्रकरणामध्ये भिस्त ठेवली आणि असे निरीक्षण नोंदवले की, दखलपात्र आणि अदखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्रत्येक प्रकरणात आरोपपत्र/ अंतिम अहवाल सादर करताना आरोपीला ताब्यात घेणे आवश्यक नाही.

केवळ दिल्ली उच्च न्यायालय हे एकमेव न्यायालय नाही ज्यांनी हा दृष्टिकोन स्विकारला आहे आणि इतर उच्च न्यायालय यांनीही तेच अनुकरण उघडपणे या धारणेवर केले की, केवळ आरोपीला अटक करून न्यायालयापुढे हजर केले नाही म्हणून फौजदारी न्यायालये आरोपपत्र स्विकारण्यास नकार देऊ शकत नाहीत.

---

2 (२०१८) २५४ डी एल टी ६४१ (डी बी)

दिनदयाल किशनचंद आणि इतर विरुद्ध गुजरात राज्य[3] या प्रकरणामध्ये, उच्च न्यायालयाने खालील प्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे :-

> " २..... अभियोग पक्षाचे प्रकरण असे होते की, दोन आरोपी म्हणजेच प्रस्तुत याचिकाकर्ता क्रमांक ४ आणि ५, ज्या महिला आहेत आणि जरी त्यांना यापूर्वी जामीनावर सोडण्यात आले होते तरी त्या आरोपपत्रासह न्यायालयासमोर हजर करण्यासाठी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे सर्व आरोपींना हजर केल्याशिवाय दोषारोपपत्र स्विकारण्यास न्यायालयाने नकार दिल्याने, दोषारोपपत्र सादर करता येत नव्हते आणि शेवटी एका विशिष्ट पत्र आणि अभिलेखावरून असेही दिसून येते की, दोषारोपपत्र हे आरोपी क्रमांक ४ आणि ५ यांच्याशिवाय सादर केले होते. हे अभिलेखावरील पुराव्यांवरून अगदी स्पष्ट आहे. [...]
>
> ... ...
>
> ८. मला या टप्प्यावर असे म्हणणे आवश्यक आहे की, फौजदारी न्यायालयांनी एकतर विद्वान दंडाधिकारी किंवा त्यांच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांमार्फत आरोपींना हजर केल्याशिवाय आरोपपत्र स्विकारण्यास नकार देणे हे कायद्याच्या कोणत्याही तरतुदींनुसार समर्थनीय नाही. त्यामुळे, सर्व न्यायालयांवर हे बिंबवले गेले पाहिजे की, जेव्हा जेव्हा पोलीसांमार्फत दोषारोपपत्र सादर केले

3 १९८३ क्रि. एल जे १५८३

जाईल तेव्हा ते कर्मचारी किंवा दंडाधिकारी यांनी आरोपपत्रावर करावयाच्या कोणत्याही वगळलेल्या किंवा आवश्यक बाबीं संबंधित असलेल्या कोणत्याही पृष्ठांकनासह स्विकारावे. परंतु, जेव्हा पोलीस दोषारोपपत्र सादर करतात तेव्हा, न्यायालयाचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी विशेषतः संहितेच्या कलम ४६८ मधील तरतुदी ज्या अपराधाची दखल घेण्याची मर्यादा निर्माण करतात, ते लक्षात घेऊन स्विकारावे. त्याचप्रमाणे, पोलीस प्राधिकाऱ्यांनी देखील सर्व पोलीस अधिकाऱ्यांवर हे बिंबवले पाहिजे की, अशा कोणत्याही कारणास्तव दोषारोपपत्र स्विकारले गेले नाही, तर सत्र न्यायाधीशांचे लक्ष योग्य गोष्टींकडे वेधून योग्य ते आदेश मिळवावेत जेणेकरून यापुढे अशा अडचणी उद्भवणार नाहीत."

आम्ही उच्च न्यायालयाच्या उपरोक्त दृष्टिकोनाशी सहमत आहोत आणि या न्यायिक दृष्टिकोनाला आमची परवानगी देऊ इच्छितो. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७० च्या तरतुदींचा विचार करून असे योग्यरीत्या निरीक्षण नोंदवले आहे की, सदर तरतुदी ह्या आरोपपत्र दाखल करताना प्रत्येक आरोपीस अटक करण्याचे बंधन प्रभारी अधिकाऱ्यावर लादत नाहीत. खरे तर, आमच्यासमोर अशी प्रकरणे आली आहेत की, जेथे आरोपीने संपूर्ण तपास प्रक्रियेत सहकार्य केले आहे आणि तरीही आरोपपत्र दाखल होत असताना, आरोपीला अटक करून त्याला न्यायालयासमोर हजर करणे बंधनकारक असल्याच्या आधारावर त्याला हजर करण्यासाठी अजामीनपात्र अधिपत्र निर्गमित करण्यात आले आहे. आमचे मत असे आहे की, आरोपी फरार होईल

किंवा समन्सची अवज्ञा करील असे जर तपासी अधिकाऱ्याला वाटत नसेल तर, त्याला/तिला कोठडीतून हजर करण्याची आवश्यकता नाही. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७० मध्ये आढळणारा 'कोठडी' हा शब्द पोलीस किंवा न्यायालयीन कोठडी या अर्थाने योजलेला नाही, तर त्याचा लक्षितार्थ केवळ आरोपपत्र दाखल करतांना तपासी अधिकाऱ्याने आरोपीस हजर करणे असा आहे.

आपण याची नोंद घेतली पाहिजे की, वैयक्तिक स्वातंत्र्य ही आपल्या घटनात्मक आदेशाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. तपासा दरम्यान आरोपीला अटक करण्याचा प्रसंग अशावेळी उद्भवतो जेव्हा कोठडीत चौकशी आवश्यक होते किंवा तो घृणास्पद गुन्हा आहे किंवा जिथे साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याची शक्यता असते किंवा आरोपी फरार होण्याची शक्यता असते. अटक ही कायदेशीर असल्यामुळे ती केली जाऊ शकते, केवळ या कारणामुळे अटक करणे बंधनकारक नाही. अटक करण्याच्या अधिकाराचे अस्तित्व आणि त्याच्या वापराचे कायदेशीररित्या समर्थन करणे यात फरक केला गेला पाहिजे. जर अटक हा नित्यक्रम झाला तर त्यामुळे व्यक्तीच्या प्रतिष्ठेला आणि आत्मसन्मानाला अपरिमित हानी पोहोचू शकते. जर तपास अधिकाऱ्याला असा विश्वास ठेवण्याचे कारण नसेल की, आरोपी फरार होईल किंवा समन्सची अवज्ञा करेल आणि प्रत्यक्षात तपासात शेवटपर्यंत संपूर्ण सहकार्य केले असेल तर आरोपींना अटक करण्यासाठी अधिकाऱ्यावर सक्ती का असावी, हे आम्ही समजू शकलो नाही.

आम्ही, प्रत्यक्षात, एका पोलिस अधिकाऱ्याने अटकेची परिस्थिती कशी हाताळावी याबाबत जोगिंदर कुमार[4] प्रकरणामध्ये जी निरीक्षणे मांडली आहेत त्याच्या

4 जोगिंदर कुमार वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (१९९४) ४ एस सी सी २६०

विपरीत अशा परिस्थितीचा सामना करत आहोत जेथे असे सांगितले जात आहे की, कलम १७० मधील तरतुदी लक्षात घेता, आरोपपत्र अभिलेखावर घेण्यासाठी पूर्व आवश्यक औपचारिकता म्हणून न्यायचौकशी न्यायालय आरोपीच्या अटकेचा आग्रह धरत आहेत. आम्ही असे मानतो की, असा उपाय अस्थानी आहे आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७६ च्या उद्देशाच्या अगदी विरुद्ध आहे.

प्रस्तुत प्रकरणात जेव्हा अपीलकर्ता तपासात सामील झाला तेव्हा तपास पूर्ण झाला आहे आणि प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्यानंतर सात वर्षानंतर ज्याला अटक करण्यात आली आहे, त्याला या टप्प्यावर, आरोपपत्र अभिलेखावर घेण्यापूर्वी त्याला अटक का केली याचे कोणतेही कारण आम्हाला वाटत नाही. आपण याची नोंद घेतली पाहिजे की, अपीलकर्त्याचे विद्वान वकील यांनी आपल्यासमोर आधीच सांगितले आहे की, समन्स जारी केल्यावर अपीलकर्ता न्यायचौकशी न्यायालयासमोर हजेरी लावेल.

त्यानुसार आम्ही आक्षेपित आदेश रद्द करीत आहोत आणि अपील वरील अटींवर मंजूर करत आहोत आणि संबंधित पक्षकारांनी त्यांचा स्वतःचा खर्च सोसावा.

[न्या. संजय किशन कौल]

[न्या. ऋषिकेश रॉय]

नवी दिल्ली ;

ऑगस्ट १६, २०२१.

बाब क्र. ३८ न्यायालय क्र. ६ (दृकश्राव्य माध्यमातून) विभाग - II

भारताचे सर्वोच्च न्यायालय

प्रकरणांचा अभिलेख

विशेष अनुमती याचिका (फौ.) क्र. ५४४२/२०२१

(अलाहबाद येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात, लखनऊ खंडपीठ यांनी सी. आर. एम. ए. बी. ए. क्र. ५०२९/२००१ मध्ये दिनांक ०९/०७/२०२१ रोजी पारित केलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश

यामधून उध्दभवणारे)

सिद्धार्थ ...... अपीलकर्ता

विरुद्ध

उत्तरप्रदेश राज्य आणि इतर ...... उत्तरवादी

दिनांक :- १६/०८/२०२१. ही याचिका सुनावणीसाठी आज पुकारण्यात आली.

न्यायमंच :- मा. न्यायमूर्ती संजय किशन कौल

मा. न्यायमूर्ती ऋषिकेश रॉय

अपीलकर्त्यांकरिता - श्री. पी. के. दुबे, वरिष्ठ अधिवक्ता

श्री. रवी शर्मा, प्रकरणातील अधिवक्ता

श्री. संदीप गौर, अधिवक्ता

श्री. सुजीत कुमार, अधिवक्ता

श्रीमती. मधुलिका राय शर्मा, अधिवक्ता

श्रीमती. छाया गुप्ता, अधिवक्ता

श्री. अंजनी कुमार राय, अधिवक्ता

उत्तरवादींकरिता - श्रीमती. गरिमा प्रशाद, वरिष्ठ अधिवक्ता, ए ए जी

श्री. सर्वेश सिंग बाघेल, प्रकरणातील अधिवक्ता

श्री. उत्कर्ष शर्मा, अधिवक्ता

विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने खालील आदेश पारित केला.

आदेश

अनुमती दिली.

अपील स्वाक्षरीत केलेल्या प्रकाशनयोग्य आदेशाच्या अटींच्या आधारे मंजूर करण्यात येत आहे.

प्रलंबित अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

(रश्मी ध्यानी) (पुनम वैद)

कोर्ट मास्टर कोर्ट मास्टर

(स्वाक्षरीत प्रकाशनयोग्य न्यायनिर्णय नस्तीमध्ये ठेवण्यात आला.)

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x